**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत संमत, राज्यघटनेच्या विरोधात जाणाऱ्यांना आळा घालण्यासाठी विधेयक आणल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- विधेयकातल्या कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना या शब्दावर विरोधकांचा आक्षेप, विधेयक असंवैधानिक असल्याचा माकपाचा दावा

- पावणे २ कोटी शेतमजुरांसाठी वीमा योजना सरकार लागू करणार, राज्यव्यापी शेतजमीन मोजणी मोहीम राबवण्याची महसूल मंत्र्यांची घोषणा

- गणेशोत्सव हा सण राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्याची सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची विधानसभेत ग्वाही

**आणि**

- पाचवी तसंच आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर

**<><><><><>**

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक आज विधानसभेत मंजूर झालं. देशाच्या, राज्याच्या सुरक्षिततेसाठी आणि राज्यघटनेच्या विरोधात जाणाऱ्यांना आळा घालण्यासाठी हे विधेयक मांडलं आहे. याचा उद्देश कोणालाही त्रास देण्याचा नाही, याचा दुरुपयोग करायची मुभा कोणालाही मिळणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधेयक मांडताना दिली.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

सशस्त्र माओवाद संपत असताना दुसरीकडे शहरी नक्षलवाद बोकाळत असून त्याला आळा घालण्यासाठी अशा प्रकारचा कायदा करण्याची सूचना केंद्र सरकारनं केली आणि त्यानुसार एकंदर चार राज्यांनी असे कायदे आणले. मात्र, महाराष्ट्रात

असा कायदा नसल्यामुळे राज्यात अशा संघटनांचं जाळं वाढत आहे. या संस्था मानवी हक्कांसाठी काम करत असल्याचं दाखवून माओवादी विचारांचा प्रसार-प्रचार करणं, त्यांना आर्थिक मदत पुरवणं, त्यांना आश्रय देणं अशी कृत्यं करत असतात, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. २०१४मध्ये यासंदर्भात लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला गृह मंत्रालयाने दिलेल्या उत्तराचा संदर्भ त्यांनी दिला आणि त्यावेळी दिलेल्या अशा संघटनांच्या यादीत असलेल्या संघटनांपैकी सर्वाधिक ६४ संघटना राज्यात कार्यरत असल्याचं सांगून मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, गडचिरोली, कोकण, अमरावती या भागांमध्ये आपल्या विचारांचा प्रचार-प्रसार करायचा या संघटनांचा उद्देश असल्याचं दिसून येतं.

या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी, शहरी नक्षलवादाच्या नावावर याचा गैरवापर होऊ नये, याकडे लक्ष वेधलं. आमदार नितीन राऊत यांनी या विधेयकामुळे राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होईल, अशी शंका उपस्थित केली. आमदार रोहित पवार यांनी या विधेयकातल्या 'कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना' या शब्दांवर आक्षेप घेत, कडवी उजवी विचारसरणी नसते का, असा सवाल विचारला. याऐवजी 'माओवादी संघटना' असा शब्द वापरावा, असं त्यांनी सुचवलं. या विधेयकाच्या जुन्या आणि नव्या मसुद्यात काही फार फरक नसून यातल्या अनेक व्याख्या मोघम असून याचा वापर गळचेपी करण्यासाठी होण्याची भीती रोहित पवार यांनी व्यक्त केली. सरकारच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या सगळ्या संघटनांवर या कायद्यान्वये कारवाई करणार का, असा प्रश्न आमदार वरुण सरदेसाई यांनी मांडला. हे विधेयक असंवैधानिक असल्याचं सांगून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आमदार विनोद निकोले याला विरोध केला. या विधेयकाबद्दल गैरसमज पसरवण्याचा आरोप भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधकांवर केला.

'डावी कडवी विचारसरणी' हा शब्द विविध कायद्यांमधून तयार झालेला आहे. सरकारचे कायदे, धोरणांविरोधात केलेल्या आंदोलनांवर या कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार नाही. ज्या संघटनांचं उद्दिष्टच अशा प्रकारच्या कडव्या डाव्या विचारसरणीला खतपाणी घालण्याचं आहे, ज्यांना राज्यघटना, तिने दिलेल्या संस्था मान्य नाहीत, त्यांच्याविरुद्ध उभं राहण्याचं ज्यांचं उद्दिष्ट आहे, त्यांच्यावरच हा कायदा बंदी आणेल, असं मुख्यमंत्र्यांनी या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना स्पष्ट केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या १ कोटी ७५ लाख शेतमजुरांसाठी विमा योजना लागू करण्यात येईल अशी घोषणा कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज विधानसभेत केली. शेतकर्यांना  देण्यात आलेल्या मदतीची माहिती त्यांनी यावेळी सभागृहाला दिली. पीक विमा योजनेच्या गैरवापरासाठी एकाही शेतकर्यावर  सरकारने कारवाई केलेली नाही, असं ते म्हणाले. शेतकर्यांच्या  कर्जमाफीसाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे, त्याबद्दलची अधिक माहिती मुख्यमंत्री देतील असं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले.

एक रुपयात विमा या योजनेत विमा कंपन्यांना सुमारे साडे सात हजार कोटी रुपयांचा नफा झाला आहे, त्या मानानं शेतकऱ्यांना हवा तसा लाभ मिळाला नाही त्यामुळे पुन्हा जुनी पीक विमा योजना राबविण्यात येत आहे अशी माहिती कृषि मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. ज्या शेतकऱ्यांनी अवकाळी पावसाने नुकसान झाल्याची तक्रार केली आहे, त्या सर्व शेतकऱ्यांना मदत दिली जाईल अशी माहिती मंत्री कोकाटे यांनी दिली.

**<><><><><>**

शेतजमीन, बांध आणि रस्त्यांवरुन निर्माण होणाऱ्या वादांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्यव्यापी शेतजमीन मोजणी मोहीम राबवणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत दिली.

जीआय तंत्रज्ञानाचा वापर करून मोजणी डिजिटलायझेशन केले जाईल. पुढील दोन वर्षांत “आधी मोजणी, मग रजिस्ट्री” धोरण राबवलं जाईल, ज्यामुळे जमिनीचे वाद कायमचे संपुष्टात येतील. शेतकऱ्यांना मंत्रालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही आणि रस्ते मोकळे करण्यासाठी लवकरच कायदा आणला जाईल, असं महसूलमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्राला गणेशोत्सवाची शंभर वर्षांची समृद्ध परंपरा असून हा सण राज्य महोत्सव म्हणून हे सरकार घोषित करेल, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज विधानसभेत दिली. हवा तितका निधी या उत्सवासाठी उपलब्ध करून देऊ, असं आश्वासन त्यांनी दिलं.

- **- होल्ड - आशिष शेलार बाइट - -**

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला आहे. या परीक्षेत इयत्ता पाचवीच्या १६ हजार ६९३ विद्यार्थ्यांना तर इयत्ता आठवीच्या १५ हजार ९३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधल्या ९५४ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केलं आहे.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ पर्यंत विधानसभा मतदार यादीत नाव नोंदवलेल्या मतदारांना मतदान करता येईल. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या

निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आज जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. त्यावेळी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी हे निर्देश दिले.

<><><><>

नाशिक जिल्हा परिषदेतल्या महिला कर्मचाऱ्यांचा नाहक छळ करणाऱ्या एका विभाग प्रमुखाला सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. ही कारवाई या विभागातल्या तीस महिला कर्मचाऱ्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्याची चौकशी सुरु आहे. राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोगानं याप्रकरणाची दखल घेतली आहे.

<><><><>

मुंबई शहर आणि उपनगरांमधल्या बेकऱ्यांमध्ये पारंपरिक इंधना ऐवजी हरित इंधनाचा वापर सुरु करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयानं आज मुदतवाढ दिली. तसंच याबाबतची सुनावणी २८ जुलैपर्यंत तहकूब केली.

<><><><>

पंढरपूर मधल्या आषाढी एकादशी यात्रेची आज गोपाळकाल्यानं सांगता झाली. यानंतर विठ्ठलाचं दर्शन घेऊन मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्यांनी परतीचा प्रवास सुरु केला.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज लॉर्ड्स मैदानावर सुरू आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. इंग्लंडचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद झाले. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या २ बाद ९५ धावा झाल्या होत्या.

पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**